# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते,
## कस्तुरबा रुग्णालय.

क्र.एचओ / 922 / केएच दि.04.05.2021

सूचना

विषय :- सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कस्तुरबा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील रिक्त असलेली नोंदणी सहाय्यक संवर्गाची पदे कंत्राटी पध्दतीने स्वयंसेवी संस्थांमार्फत भरण्याबाबत.

या सुचनेद्वारे नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना (NGO) कळविण्यात येते की, कस्तुरबा रूग्णालयात डाटा एंट्री ऑपरेटर कंत्राटी पध्दतीने पुरविण्याबाबत अर्ज नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव इ. कागदपत्रासह वैद्यकिय अधिक्षक, कस्तुरबा रुगणालय यांचे प्रशासकीय कार्यालय येथे दिनांक 14.05.2021 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत सादर करावेत.

स्वयंसेवी संस्थांनी (NGO) निम्नलिखित बाबी विचारात घेऊन आपल्या अर्जासोबत आवश्यक बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1) सदर कामाकरिता नोंदणीकृत संस्थांनी अर्ज करावे.
2) कस्तुरबा रुगणालयात 2 डाटा एंट्री ऑपरेटर कंत्राटी पध्दतीने स्वयंसेवी संस्थेस कार्यालयीन आदेश दिल्याच्या दिनांकापासून लसीकरण केंद्र चालू असेपर्यंत किंवा रिक्त पदे भरेपर्यंत जे अगोदर असेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील.
3) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांना प्रतिमाह रु.15000/- इतक्या रकमेचे अधिदान करण्यात येईल.
4) डाटा एंट्री ऑपरेटर कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
5) डाटा एंट्री ऑपरेटर यांना मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे तसेच संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
6) डाटा एंट्री ऑपरेटराना रूग्णालयातील कामकाजाच्या वेळेनुसार काम करावे लागेल.
7) पात्र कंत्राटदारांना सक्षम कामगारांचा पुरवठा करणे आवश्यक राहील.
8) पात्र कंत्राटदाराच्या देयकाच्या रकमेचे अधिदान महापलिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परीक्षणानंतर ECS/NEFT द्वारे करण्यात येईल.
9) बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे.
10) पात्र स्वयंसेवी संस्थानी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाचा अनुभव सिध्द होईल अशी कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत. सदर कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर स्वयंसेवी संस्था अपात्र ठरल्यास सोडतीमध्ये त्यांचा विचार करण्यात येणार नाही.
11) समाधानकारक काम न करणा-या संस्थेकडून काम थांबविण्याचे अधिकार वैद्यकिय अधिक्षक, कस्तुरबा रुगणालय यांचे असतील.
12) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन लॉटरी पध्दतीने स्वयंसेवी संस्थेची निवड करण्यात येईल.

सही/-

वैद्यकिय अधिक्षक
कस्तुरबा रुग्णालय